# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १०.०५.२०२६ रविवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे गणेशपेठ :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १०.०५.२०२६ चे ०४.०० वा. ते ०५.३० वा. चे दरम्यान, गणेशपेठ पोलीसांना पोलीस नियंत्रण कक्ष, नागपूर शहर मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, पोलीस ठाणे हद्दीत, गितांजली चौक, साई मंदीर जवळ, बजेरीया येथे एका महेंद्रा झायलो कार क्र. एम.एच. ०४ डी.डब्लू. ९८३३ चा अपघात झाला असुन, वाहनातील दोन ईसमांना मारहाण होत आहे. अशा प्राप्त माहितीवरून गणेशपेठ पोलीस घटनास्थळी गेले असता, तेथे नमुद कार ही डिव्हायडरला धडकलेली तसेच, दोन ईसमांना ईतर १० ते १२ ईसमांनी पकडून ताब्यात बसवुन ठेवल्याचे दिसून आले. ताब्यातील आरोपी ईसमांना त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नावे १) अयान हमीद सय्यद, वय २१ वर्षे, रा. रजेगाव, गोंदीया, २) विजय पेंढार सोनवाणी, वय २० वर्षे, रा. मौदा, कटेंगी, जि. बालाघाट (म.प्र.) असे सांगुन ते कार चालक व सोबती असल्याचे सांगीतले. अधिक विचारपुस केली असता, नमुद झायलो कारमध्ये ०७ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निर्दयतेने चारा—पाणी न देता बांधुन कत्तलीकरीता वाहतुक करीत असता, लोकांनी थांबविण्याचा ईशारा केल्याने वाहनचालक वाहन भरधाव वेगाने नेत असता, वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण बिघडल्याने नमुद झायलो कार डिव्हायडरला धडकुन अपघात झाला असल्याचे समजले. पोलीसांनी दोन्ही आरोपींना नमुद गोवंशीय जनावरांबाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे नसल्याचे त्यांनी सांगितले. नमुद दोन्ही आरोपी हे गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता मोमीनपूरा, नागपूर येथे नेत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन ०७ गोवंशीय जनावरे व महेंद्रा झायलो कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गौशाला येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोहवा. राजेश कुंभरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. उमेश तायडे ८४५९१९४११५ यांनी आरोपींविरूध्द कलम २८१, १२५ भा.न्या.सं. तसेच, सहकलम ५, ५(अ), ५(ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११ प्राणी क्रुरता अधिनियम—१९६०, सहकलम ६६, १९२, १२५, १८४, मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०५.२०२६ चे ०२.३० वा. ते ०३.०० चे दरम्यान, फिर्यादी विशाल विरेंद्र कोठारी, वय २० वर्षे, रा. फ्लॅट नं. ३०५, ताजेश्री लक्ष्मण अपार्टमेन्ट, क्वेटा कॉलोनी, लकडगंज, नागपूर हे त्यांचे ईतर चार मित्र असे पाचजण त्यांचे मित्राचे इनोवा क्रिस्टा कारने पोलीस ठाणे वाडी हद्दीतील पंजाबी ढाबा, अमरावती

रोड, गोंडखैरी येथून जेवण करून घराकडे परत जात असतांना, त्यांचे कारचे टायर फाटल्याने वाहन डिव्हायडरला धडकले. अपघातामध्ये फिर्यादीचे दोन्ही हाताला मार लागल्याने रक्त निघत होते. फिर्यादीचे मित्राने एका डबलसिट जात असलेल्या दुचाकी पल्सर क्र. एम.एच ४९ ए.डब्लू. २२५९ ला थांबवून, त्यावरील वय अंदाजे २० ते २५ वर्षे वयोगटाचे दोन अनोळखी बाईकस्वार आरोपी यांना फिर्यादीस उपचाराकरीता हॉस्पीटलला नेण्याची विनंती केली. आरोपी बाईकस्वार यांनी जखमी फिर्यादीला आपले दुचाकीवर ट्रीपलसिट बसवून थोड्या अंतरापर्यंत नेवून वाहन थांबविले, व ''समोरील चौकामध्ये पोलीस उभे आहेत, ट्रीपल सिट बसल्याने गाडीचे चालान करतील.'' असे म्हणून, न्यु म्हाडा कॉलोनी सुराबर्डी रोड, वाडी येथे घेवून गेले. तेथे पेट्रोल संपल्याचे सांगून फोनद्वारे त्यांचे तिसऱ्या साथीदाराला घटनास्थळी बोलावून घेतले. आरोपींचा तिसरा साथीदार आल्यावर, आरोपींनी संगणमताने फिर्यादीस चाकुचा धाक दाखवून जबरदस्तीने फिर्यादीचे खिश्यातून रोख २,५००/—रू. व फिर्यादीचे हातातील तीन सोन्याच्या अंगठ्या वजनी १५ ग्रॅम असा एकुण ७७,५००/— रू. चा मुद्देमाल काढून घेतला. तसेच, गळ्यातून सोन्याची चैन जबरदस्तीने काढत असतांना, फिर्यादीचे मित्र घटनास्थळी आल्याने तिन्ही आरोपी तेथून पळून गेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. भागवत काळींगे ९३२११३५७२२ यांनी दोन पल्सरस्वार व त्यांचा साथीदार असे तीन्ही आरोपींविरूध्द कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे कोराडी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०७.०५.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ०८.०५.२०२६ चे ०१.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत, घर नं. १९८, वार्ड नं. ०५, बोखारा, नागपुर येथे राहणारे फिर्यादी रोहित राजेश पौतारे, वय २६ वर्षे हे आपले राहते घराचे किचनचे मागील दार लोटून व मुख्य दाराला कुलुप लावुन परिवारासह बहिणीचे साक्षगंध व हळद समारंभाकरीता रॉयल सेलीब्रेशन गोधणी टी—पॉईंट येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे किचनचे मागील लोटलेल्या दाराने घरात प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १,५०,०००/—रू. तसेच, सोन्याची अंगठी वजनी ३.५ ग्रॅम असा एकुण किंमती १,५९,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. तुषार नवले ९७६४८७०८०३ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** कु. सरोजीनी रमेश विश्वकर्मा, वय २१ वर्षे, रा. बेसा, ईश्वर गायकवाड यांच्या घरी किरायाने, मस्जीद जवळ, नागपूर ही दिनांक ०८.०५.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ४ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— मेहरून रंगाचा कुर्ता, काळ्या रंगाची लॅगीन घातलेले असुन, पायात गुलाबी रंगाची जुती आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळख— उजव्या हातावर इंग्रजीत ''एस'' अक्षर गोंदलेले आहे.


सरोजीनी

स्वा/–

( नितीन चुलपार )
सहा.पोलीस निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.